**प्रेस नोट दि. १८/०५/२०२०**

**किरकोळ भांडणाच्या कारणावरून तरुणाचा देहुगावामध्ये खुन, गुन्हे शाखेने ५ ने ०३ आरोपींच्या मुसक्या आवळुन खुनाचा गुन्हा केला ४ तासामध्ये उघड**

दि १८/०५/२०२० रोजी एका अज्ञात इसमाची हातपाय बांधलेली बॉडी गाथा मंदीर, देहुगाव, येथे इंद्रायणी नदी पात्रात मिळुन आली होती. सदर अज्ञात इसमाचा अज्ञात आरोपींनी अज्ञात करणांकरीता खुन केला असल्याने **देहुरोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र. ४५४/२०२० भारतीय दंड विधान कलम ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट ५ करीत होते.

सदर मयत अज्ञात इसम कोण आहे याची चौकशी करीत असाताना **सपोनि राम गोमारे व पो.ना. दत्तात्रय बनसुडे** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, सदरची डेडबॉडी ही सुनिल नावाचे कामगाराची असुन तो इंद्रायणी नदीचे कडेला शेतामध्ये राहत असतो. त्याअनुशंगाने सखोल तपास केला असता सदरची डेड बॉडी ही सुनिल रामराव मरजकोले वय ३५ वर्षे, रा. अंतरगाव पालुटी, कळंब, ता. राळेगाव, जि. यवतमाळ, असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुशंगाने सदर मयत इसम कोणासोबत राहत होता याची सखोल चौकशी केली असता तो टायगर, पवन, महेंद्र व अजुन एक व्यक्ती यांचेसोबत राहत असल्याची माहिती मिळाली. त्याअनुशंगाने सदर इसमांची आमचे गोपनीय बातमीदारांमार्फत बातमी काढुन त्यांचा शोध घेतला असता त्यापैकी टायगर, पवन, महेंद्र यांना सांगुर्डी फाटा येथुन ताब्यात घेवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१ अनिकेत ऊर्फ टायगर बाबुराव शिंदे वय १९ वर्षे, रा विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे मुळ गाव मु.पो. उमरखेड, ता उमरखेड जि यवतमाळ, २ पवन किसन बोरोले वय २६ वर्षे, रा विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे रा. आटमोडी, ता. राळेगाव, जि यवतमाळ ३. महेंद्र विजय माने वय ३८ वर्षे, रा विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे मुळ रा. गवळीनगर, गावडे चाळ, भोसरी पुणे** अशी असल्याचे सांगितली. त्यांचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने चौकशी केली असता त्यांनी काहीएक उपयुक्त माहिती दिली नाही व उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने त्यांचेवर संशय बळावल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत यांनी आदेशीत केल्याप्रमाणे ताब्यात घेण्यात आलेले संशयित इसमांना गुन्हे शाखा, युनिट ५ कार्यालय येथे आणून त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता **इसम नामे अनिकेत ऊर्फ टायगर बाबुराव शिंदे यांनी गुन्हयाची कबुली दिली व त्याने सदर गुन्हा १ पवन किसन बोरोले वय २६ वर्षे, रा विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे रा. आटमोडी, ता. राळेगाव, जि यवतमाळ २. महेंद्र विजय माने वय ३८ वर्षे, रा विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे ३ सचिन पुर्ण नाव माहित नाही विठठल रामभाउ कुंभार यांचे प्लॉटींग इंद्रायणी नदी काठी, देहुगाव, जि. पुणे यांचे मदतीने केल्याचे कबुल केले. दि. १४/५/२०२० रोजी दुपारी दारूपिण्याचे कारणावरुन झालेल्या किरकोळ वादातुन दि १५/५/२०२० रोजी रात्रौ ००.३० वा चे दरम्यान मयतास लाथा बुक्क्यांनी तोंडावर पंच मारुन डोक्यात दगड मारुन पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने मयताचे हातपाय बांधुन त्यास दगड बांधुन इंद्रायणी नदीपात्रामध्ये टाकुन त्यास जिवे मारले आहे.** सदर आरोपींना दाखल गुन्हयाचे तपासकामी देहुरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात देत आहोत. यातील चौथा आरोपी नामे सचिन पुर्ण नाव माहित नाही याचा शोध घेत आहोत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुकत गुन्हे २ मा. श्री श्रीधर जाधव यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-५ चे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत , गुन्हे शाखा, राम गोमारे सहा. पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी धनराज किरनाळे, दत्तात्रय बनसुडे, मयुर वाडकर, संदिप ठाकरे, फारुक मुल्ला, स्वामीनाथ जाधव, धनंजय भोसले, राजकुमार इघारे, ज्ञानेश्वर गाडेकर, भरत माने, श्यामसुदर गुट्टे, दयानंद खेडकर, गोपाळ ब्रम्हांदे, सावण राठोड, गणेश मालुसरे, नितीन बहिरट, राजेंद्र शेटे, राजेंद्र कदम, नागेश माळी यांनी केली आहे.

**(बाळकृष्ण सावंत)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट -५, पिंपरी-चिंचवड